# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## विधान भवन, मुंबई

क्रमांक १७८९५ /ह शाखा
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२१.

:: परिपत्रक ::

संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.३०६३०/ह शाखा, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७
२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२५९०५/ह शाखा, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८
३) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.५६७/ह शाखा, दिनांक ७ जानेवारी, २०१९
४) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.६७५/ह शाखा, दिनांक १६ डिसेंबर, २०१९
४) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१७३९२/ह शाखा, दिनांक १२ डिसेंबर, २०२०

निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ अन्वये महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियमात सुधारणा झालेली आहे. अधिनियमातील नवीन सुधारणेनुसार मा.सदस्यांना वेतन व भत्त्यामधून मिळणाऱ्या रकमेपैकी मूळ वेतन व महागाई भत्त्याची रक्कम आयकर अधिनियम १९६१ मधील तरतूदीनुसार आयकरास पात्र ठरत आहे. तसेच त्यांना अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्याच्या दरामध्ये वेळोवेळी वाढ झालेली आहे. सन्मा.सदस्यांना सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे वेतन/भत्ते अनुज्ञेय आहेत :-

| अ.क्र. (१) | वेतन/भत्ते तपशील (२) | वेतन रुपयात (३) | आयकरास पात्र/अपात्र बाबी (४) |
|---|---|---|---|
| १) | मूळ वेतन | १,८२,२००/- | पात्र |
| २) | महागाई भत्ता वेतनाच्या २८% (दिनांक १.१०.२०२१ पासून) | ५१,०१६/- | पात्र |
| ३) | दूरध्वनी भत्ता | ८,०००/- | अपात्र |
| ४) | टपाल व स्टेशनरी भत्ता | १०,०००/- | अपात्र |
| ५) | संगणक चालक सेवा भत्ता | १०,०००/- | अपात्र |
| | एकूण वेतन:- | रु.२,६१,२१६/- | |

तुर्तास, मा.सदस्य यांच्या सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील माहे मार्च, २०२१ ते फेब्रुवारी, २०२२ पर्यंतच्या मूळ वेतन व महागाई भत्त्याची रक्कम गृहित धरुन त्या रक्कमेवर लागू होणाऱ्या आयकराची वजाती नियमानुसार माहे एप्रिल, २०२१ पासून त्यांच्या वेतन व भत्त्यामधून करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे आमदार निवास कक्षाऐवजी घरभाडे प्रतिपूर्तीची रक्कम अदा करताना सदर रकमेतून देखील आयकराची वजाती करण्यात येत आहे. या कार्यवाहीसाठी आयकर अधिनियम, १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून सर्व सन्मा.सदस्यांनी पुढील बाबींची पुर्तता करण्याची आवश्यकता आहे :-

**(१) या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या Income Tax Declaration Form चे कृपया अवलोकन करावे. अधिनियमातील तरतूदीनुसार सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात आयकरातून सूट प्राप्त होणेकरिता या अधिनियमातील कलम ८०सी, ८० सीसीसी, ८०सीसीडी, ८०डी, ८०जी अंतर्गत समाविष्ट बाबीमध्ये रक्कम गुंतविली असल्यास, अशा गुंतवणुकीचा तपशील Income Tax Declaration Form भरुन सन्मा.सदस्यांनी स्व:साक्षांकित (self-attested) केलेली**

२/-

D:\Mahadeshwar Madam\...\Income Tax Declaration 2020-2021\Paripatrak 2020-2021.docx

गुंतवणुकीची कागदपत्रे तसेच इतर आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह सोमवार, दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजीपर्यंत विधान भवन, मुंबई येथील "ह-१" कक्षात सादर करावीत. सदरहू माहिती प्राप्त झाल्याशिवाय आयकराची अंतिम रक्कम निश्चित करणे या सचिवालयास शक्य होणार नाही. त्यामुळे सन्मा.सदस्यांकडून गुंतवणुकीचा तपशील विहित मुदतीत प्राप्त झाला नाही तर अशी कुठलीही गुंतवणुक सन्मा.सदस्यांनी केलेली नाही असे गृहीत धरुन आयकराची आकारणी करण्यात येईल.

(२) अधिनियमातील तरतूदी, खाजगीरित्या केलेल्या गुंतवणुका तसेच, ज्येष्ठ नागरिक सवलत इत्यादी बाबींवर आयकराच्या रकमेची वजाती अवलंबून असल्यामुळे प्रकरणनिहाय आयकर वजातीची रक्कम भिन्न राहील. आयकरासंदर्भातील कार्यवाहीमध्ये केवळ वेतन व आमदार निवास कक्ष भाडे प्रतिपूर्ती रक्कम या साठीचा फॉर्म १६ अ या सचिवालयाकडून सन्मा.सदस्यांना देण्यात येणार आहे. ज्या सन्मा.सदस्यांचे वेतनाव्यतिरिक्त उत्पन्नाचे अन्य स्त्रोत आहेत त्यांनी Form 16 A या सचिवालयाकडून प्राप्त करुन घेऊन अतिरिक्त आयकर आकारणीसंदर्भातील पुढील आवश्यक ती कार्यवाही स्वतंत्ररित्या त्यांचे स्तरावर करणे आवश्यक आहे.

(३) मा.सदस्यांचे स्वीय सहाय्यक यांच्या पारिश्रमिकामध्ये सुध्दा दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ पासून वाढ करण्यात आली असून ते दरमहा रुपये २५,०००/- इतके आहे. त्याचप्रमाणे सन २०२० मध्ये महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम,१९५६ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार मा.सदस्यांना वाहनचालकांची सेवा अनुज्ञेय आहे. सद्य:स्थितीत वाहनचालकाचे पारिश्रमिक रु.१५,०००/-प्रती महा इतके निश्चित करण्यात आले आहे. सन २०२१-२०२२ या वर्षात स्वीय सहाय्यक व वाहनचालकांच्या पारिश्रमिकाची एकूण वार्षिक रक्कम अनुक्रमे रुपये ३,००,०००/- व रुपये १,८०,०००/ इतकी होत असल्यामुळे ही रक्कम तुर्ततरी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी आयकरास पात्र ठरत नाही. त्यामुळे त्यांनी उपरोक्त कागदपत्रांची पुर्तता करण्याची आवश्यकता नाही.

या सचिवालयाकडून मा.पीठासीन अधिकारी, मा.विरोधी पक्षनेते, मा.सदस्य यांचे वेतन तसेच त्यांच्या स्वीय सहायकाचे पारिश्रमिक ECS/NEFT द्वारे अदा करण्याची कार्यवाही करताना मा.सदस्यांच्या वेतनासोबतच स्वीय सहायकाचे पारिश्रमिक देखिल प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेला त्या त्या स्वीय सहाय्यकाच्या बँक खात्यात थेट जमा होते. मा.सदस्यांनी नियुक्त केलेल्या वाहनचालकाचे पारिश्रमिक देखील याचप्रमाणे ठराविक तारखेला त्यांच्या त्यांच्या खात्यात थेट जमा होणार आहे. त्यामुळे स्वीय सहायकाची व वाहनचालकाची सेवा समाप्ती भूतलक्षी प्रभावाने करता येणार नाही; त्याचप्रमाणे सेवा समाप्तीबाबतचे पत्र त्या त्या महिन्याच्या पंधरा तारखेच्या आत देणे आवश्यक राहील.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, मा.सदस्यांकडून स्वीय सहायकाच्या नेमणूका व सेवा समाप्तीबाबत वारंवार बदल होत असतो तसेच काही मा.सदस्य अद्यापही त्यांच्या स्वीय सहायकाची नियुक्ती अथवा सेवा समाप्ती भूतलक्षी प्रभावाने करीत असतात. स्वीय सहाय्यकाच्या नियुक्तीचा कालावधी अधिक भूतलक्षी असल्यास त्या कालावधीतील

३/-

वेतन देयके पारित होण्यास अडचणी येतात तसेच लेखापरिक्षणाच्या वेळी यासंदर्भात आक्षेप देखील नोंदविले जाऊ शकतात. त्यामुळे स्वीय सहायकांची नियुक्ती भूतलक्षी प्रभावाने करण्यात येऊ नये अशी पुनःश्च विनंती करण्यात येत आहे.

स्वीय सहायकाच्या आयकराची निश्चिती ही त्यांना मिळणाऱ्या परिश्रमिकाच्या वार्षिक उत्पन्नावर करण्यात येते अशा परिस्थितीत आर्थिक वर्षाच्या मध्यंतरातच स्वीय सहायकाची सेवा समाप्ती अथवा नियुक्ती केल्यास त्याचा थेट परिणाम स्वीय सहायकाच्या वार्षिक उत्पन्न व त्यानुषंगाने करण्यात येणाऱ्या आयकर वजातीवर होणार असल्याने स्वीय सहायकाची नियुक्ती अथवा सेवा समाप्ती आर्थिक वर्षाच्या मध्यंतरीच्या काळात केल्यास अडचणीचे ठरते. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता स्वीय सहाय्यकांचे वेतनातील वार्षिक उत्पन्न आयकरास पात्र ठरत नसले तरी आगामी वर्षात त्यात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अत: यासंदर्भातदेखिल सन्मा.सदस्यांनी नोंद घेऊन सहकार्य करावे.

तसेच, मा.सदस्यांनी या सचिवालयास स्वीय सहायकाचे नाव आणि त्यांचा सेवा नियुक्तीचा दिनांक कळविल्याप्रमाणे त्या स्वीय सहायकास वेतन अदा करण्याची कार्यवाही या सचिवालयाकडून करणे क्रमप्राप्त ठरते. आता वाहनचालकाबाबत याचप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. परंतु स्वीय सहायकाची किंवा वाहनचालकाची सेवा सदस्याकडून भूतलक्षी प्रभावाने समाप्त केल्यास संबंधितास अदा केलेल्या वेतनाची वसुली करता येत नाही आणि याच कालावधीसाठी नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या स्वीय सहायकास / वाहनचालकास वेतनही अदा करता येत नाही. एकंदरीत स्वीय सहायकाची / वाहनचालकाची भूतलक्षी प्रभावाने सेवा नियुक्ती आणि सेवा समाप्ती या बाबी वेतनाच्या, लेखापरिक्षणाच्या आणि आयकर वजातीच्या कार्यवाहीसाठी अडचणीच्या ठरतात.

**वरील वस्तुस्थिती विचारात घेता यापूर्वीच वेळोवेळी सूचित केल्यानुसार स्वीय सहायकाची व वाहनचालकांची नेमणूक व सेवा समाप्ती भूतलक्षी प्रभावाने करण्यात येऊ नये.**

उपरोक्त नमूद सर्व बाबींसंदर्भात काही अडचणी असल्यास, या सचिवालयाच्या "लेखा" कक्षाशी संपर्क साधावा.

अत: उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन सहकार्य करावे ही विनंती.

( मेघना तळेकर )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

सोबत: Declaration Form

**प्रति :-**

**१) महाराष्ट्र विधीमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य.**
**२) सन्मा.सदस्यांचे स्वीय सहायक.**

**याची प्रत :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
६) विधीमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.

## Annexure - I

## Investment Declaration Form for the Year 2021-2022

| | | | |
|---|---|---|---|
| **Name** | | **Designation** | |
| **Gender** | | **PAN No** | |
| **Date of Birth** | | **Elected Member Date** | FROM<br>TO |

I hereby declare that the following investment will be made by me during the financial year 2021-2022

| Sr. No. | Particulars | Eligibility (Rs.) | Amount |
|---|---|---|---|
| **Deduction u/s 24** | | | |
| 1. | Interest on Housing Loan u/s 24(If the house is Self-Occupied and the loan was taken before 1st April 1999)<br>Bankers Certificate to be Submitted) | Upto Rs.30000/-(If Self-Occupied) | |
| 2. | Interest on Housing Loan u/s 24<br>(If the house is Self-Occupied and the loan was taken after 1st April 1999)<br>Bankers Certificate to be Submitted) | Upto Rs.200000/-(If Self-Occupied) | |
| **Deduction u/s 80C (Maximum Amount Upto Rs.150000/-)** | | | |
| 3. | Life Insurance Premium(LIC) | | |
| 4. | Provident Fund(PF) | | |
| 5. | Public Provident Fund(PPF) | | |
| 6. | Voluntary Provident Fund(VPF) | | |
| 7. | National Savings Certificate(NSC) | | |
| 8. | Interest accrued on NSC(Re-invested) | | |
| 9. | Unit Linked Insurance Policy(ULIP) | | |

..2/-

| | | |
|---|---|---|
| 10. | Equity Linked Savings Scheme(ELSS)-Mutual Fund | |
| 11. | Payment for Tuition Fees for Children (Max. 2 Children) | |
| 12. | Principal Repayment Of Housing Loan | |
| 13. | Stamp Duty, Registration charges incurred for Buying House(1st Year Only) | |
| 14. | Infrastructure Bonds | |
| 15. | Bank Fixed Deposit For 5 Years & Above | |
| 16. | Post Office Term Deposit For 5 Years & Above | |
| **Other deduction u/s 80** | | |
| 17. | Interest for Loan taken for Higher Education u/s 80 E | No Limit (Only Interest portion) |

I hereby declare that Information as stated above is true and correct. I also authorize the Maharashtra Legislature Secretariat to recover tax (TDS) from my salary based on the declaration/documents submitted by me. I am personally liable to Income Tax proceedings for any misstatements in the declaration or proofs submitted herewith if they are inconsistent with the requirement of Income Tax Act. 1961.

I .......................................................................... solemnly declare that to the best of my knowledge and belief the information given above is correct and complete.

Date :

Signature

Place :

**NOTE: 1) KINDLY SUBMIT THIS FORM BEFORE 20th DECEMBER, 2021 WITH SUPPORTING DOCUMENTS.**
**2) PLESE PROVIDE SELF ATTESTED SUPPORTING DOCUMENTS WITH DECLATARION FORM.**